**असुधारित प्रत**

# विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक

राज्यपालांचे अभिभाषण सकाळी ११.०० वाजता सुरु होणार आहे. अभिभाषण संपल्यानंतर २० मिनिटांची विश्रांती राहील. त्यानंतर विधानसभेच्या दिवसाच्या कामकाजाचा क्रम पुढीलप्रमाणे राहील :-

# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**गुरूवार, दिनांक ३ मार्च, २०२२**

**शुभारंभ : वंदे मातरम्.**

**एक : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.**

**तीन : अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

**नगरविकास मंत्री** : (क) सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अध्यादेश, २०२२.

(ख) सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२२.

**चार** : सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**पाच** : सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२१ च्या संबंधात राज्यपाल यांच्याकडून आलेला संदेश.

**सहा** : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती / राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करणे.

**सात** : अध्यक्षांनी, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करणे.

**आठ** : अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव याबाबत समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

**नऊ** : **शोक प्रस्ताव -**

भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता दिनानाथ मंगेशकर, उद्योगपती राहुल कमलनयन बजाज, श्री.नारायण ज्ञानदेव पाटील, माजी वि.स.स. व माजी मंत्री, सर्वश्री गजानन धरमशी बाबर, विश्वासराव आत्माराम पाटील, नरेंद्रसिंग भगतसिंग पाडवी, माजी वि.स.स. व श्रीमती आशाताई मारोतीअप्पा टाले, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ मार्च, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा